**फिलोमिना नलावडे पु.श्र. फिलोमिना परेरा**

**विरुध्द**

**मनवेल आंतोन परेरा-रेडकर व.**

**निशाणी क्रमांक १०२ वरील आदेश**

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१५ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''विना कैफियत'' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१५ यांच्या मते, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१५ हे सदर दाव्याच्याकामी हजर झालेले असून, प्रतिवादी क्र.१५ हे आजारी असल्यामुळे त्यांना योग्य वेळी महसुल दप्तरातील कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांनी दाव्याचे गुणदोषावर मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द विना कैफियत असा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१५ यांनी जाणुनबुजून कैफियत देण्यास विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र.१५ यांची कैफियत दाखल होणे आवश्यक आहे, तसे न झाल्यास त्यांचे अपरिमीत असे नुकसान होणारे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे 'विना कैफियत' आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र.१५ यांनी केलेली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र.११२ वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांचे अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१५ यांनी विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण व त्याबाबतचा कोणताही पुरावा दिलेले नाही. सदरचा अर्ज कायद्याने चालणारा नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासहित नामंजुर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द धडेवाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे

अवलोकन केले असता, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१५ यांना दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर दि.२४.०६.२०२५ रोजी वकिलांमार्फत हजर झाले परंतु, त्यांनी प्रस्तुत दाव्यास मुदतीत कैफियत दाखल न केल्याने प्रतिवादी क्र.१५ यांचेविरुध्द 'विना कैफियत' असा आदेश दि.२१.११.२०२५ रोजी पारीत झालेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.१५ यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**–:: आदेश ::–**

१. प्रतिवादी क्र.१५ यांचा नि.१०२ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये २००/– (रु.दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१५ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/–

दिनांक– १६/०७/२०२६

( एन.ए.बकरे )

ठिकाण– कुडाळ

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कुडाळ